# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०६/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## पोलीस भरती प्रकीया

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील रिक्त पदे भरणे साठी मैदानी चाचणी परीक्षा दिनांक १९/०६/२०२४ पासून संपूर्ण राज्यभर सुरु होणार आहे. उमेदवारांना विविध पदांकरिता (पोलीस शिपाई, चालक, बँडसमन, सशस्त्र पोलीस शिपाई, तुरुंग विभाग शिपाई) एका घटकात किंवा वेगवेगळया घटकांत अर्ज करता येतात. त्यानुसार काही उमेदवारांना एकाच दिवशी अथवा लागोपाठचे दिवशी दोन पदांकरिता मैदानी चाचणी साठी हजर राहणे बाबत ची स्थिती निर्माण होवू शकते व त्यामुळे काही उमेदवरांची गैरसोय होवू शकते. म्हणून सर्व घटक प्रमुखांना व Mahait विभागास सूचना देण्यात आली आहे की, ज्या उमेदवारास एकच वेळी दोन पदांकरिता मैदानी चाचणीस हजर राहणे साठी सूचना दिली असेल असा उमेदवार पाहिल्या ठिकाणी हजर राहिल्या नंतर त्या उमेदवारांना दुसरी ठिकाणी वेगळी तारीख देण्यात यावी. दुसऱ्या ठिकाणचे घटक प्रमुखांनी अशा उमेदवारांची मैदानी चाचणी घ्यावी. तसेच मैदानी चाचणी ची पहिली तारीख आणि दुसरी तारीख यामध्ये किमान ४ दिवसांचे अंतर असावे. मात्र या करिता उमेदवार पहिल्या मैदानी चाचणीस हजर होता याचे लेखी पुरावे दुसऱ्या मैदानी चाचणी वेळी सादर करावे लागतील. पोलिस भरती २०२२–२३ मधे ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केले आहेत आणि त्यांची मैदानी चाचणी एकाच दिवशी आली असेल अश्या उमेदवारांना किमान ०४ दिवस अंतराने वेगवेगळया तारखा दिल्या जातील. उमेदवारांना अडचण/शंका असल्यास त्यांनी raunak-saraf@mahait.org यावर ईमेल करावा.

नागपूर जिल्हा ग्रामीण येथे पोलीस भरती २०२२–२३ मध्ये एकुण १२९ पदाकरीता १४२७४ अर्ज प्राप्त झाले असुन त्यामध्ये पुरूष उमेदवाराचे १०३९४ अर्ज व महिला उमेदवाराचे ३८८० अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर पोलीस भरती प्रक्रीया दि. १९/०६/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा. पासुन सुरू होणार असुन सर्व उमेदवाराने वेळेमध्ये पोलीस मुख्यालय टेका नाका नागपूर ग्रामीण येथे हजर राहावे. सदर पोलीस भरती प्रक्रीयेमध्ये कोणत्याही उमेदवाराने गैरप्रकार केल्यास किंवा घालुन दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास त्यावर कायदेशिर कठोर कारवाई करण्यात येईल.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण ४०,५५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक १७/०६/२०२४ रोजी सकाळी ११/०० वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत स्टाफसह बकरी ईद सणा निमित्त बंदोबस्त दरम्यान पो. स्टे. परिसरात पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर टिप्पर क्र. MH-40/CM -9910 हा येताना दिसल्याने बोरगाव शिवारातील महादुला फाट्याजवळ नाकाबंदी दरम्यान टिप्परला थांबवून पाहणी केली असता १२ चाकी टिप्पर क्र. MH-40/CM -9910 मध्ये अंदाजे ८ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगून ट्रक मालकाचे सांगण्यावरून भंडारा येथील रेती घाटातून आणल्याचे सांगितले. सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर क्र. MH-40/CM -9910 किं. रु. ४०,००,०००/— व त्यामधील ८ ब्रास रेती किं. रु. ४०,०००/— तसेच आरोपीचा मोबाईल फोन कीं १५,०००/—रू. असा एकूण रु. ४०,५५,०००/— चा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक नामे दुर्गेश सुरेश गौरी वय २४ वर्ष रा. बीड ता. मोहाडी जी. भंडारा तसेच ट्रक मालक अमित नन्हेलाल यादव रा. मौदा यांचे विरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस हर्ष पोद्दार सा., मा. अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी साहेब कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, स.फौ. भास्कर मेटकर, पो. हवा. सतीश नागपुरे, चासफौ कोठे यांनी केलेली असून गुन्ह्याचा पुढील तपास पो.हवा. संदीप कडू हे करित आहे.



## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण ४०,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक १७/०६/२०२४ रोजी सकाळी ११/५० वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत स्टाफसह बकरी ईद सणा निमित्त बंदोबस्त दरम्यान पो. स्टे. परिसरात पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर टिप्पर क्र. MH-40/CM -9910 हा येताना दिसल्याने बोरगाव शिवारातील सांड नदीवरील बोरगाव पुलावर रेती वाहतुकीच्या टिप्परला थांबवून पाहणी केली असता १२ चाकी टिप्पर क्र. MH-40/CT -9910 मध्ये अंदाजे ८ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगून ट्रक मालकाचे सांगण्यावरून भंडारा येथील रेती घाटातून आणल्याचे सांगितले. सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर क्र. MH-40/CT-9910 किं. रु. ४०,००,०००/— व त्यामधील ८ ब्रास रेती किं. रु. ४०,०००/— तसेच आरोपीचा मोबाईल फोन कीं १०,०००/— असा एकूण रु. ४०,५०,०००/— चा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक नामे आकाश जयसिंग मडावी वय २७ वर्ष रा. दिघोरी ता. जि. भंडारा तसेच ट्रक मालक अमित नन्हेलाल यादव रा. मौदा यांचे विरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७),४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस हर्ष पोद्दार सा., मा. अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी साहेब कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, स.फौ. भास्कर मेटकर, पो. हवा. सतीश नागपुरे, चासफौ कोठे यांनी केलेली असून गुन्ह्याचा पुढील तपास पो.हवा. गणेश मुदमाळी हे करित आहे.



## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण ४०,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक १७/०६/२४ रोजी सकाळी १२/४५ वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत स्टाफसह बकरी ईद सणा निमित्त बंदोबस्त दरम्यान पो. स्टे. परिसरात पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर टिप्पर क्र. MH-06/BW -5156 हा येताना दिसल्याने मारोडी शिवरातील NH-53 वर रेती वाहतुकीच्या टिप्परला थांबवून पाहणी केली असता १२ चाकी टिप्पर क्र. MH-06/BW -5156 मध्ये अंदाजे ८ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगून ट्रक मालकाचे सांगण्यावरून भंडारा येथील रेती घाटातून आणल्याचे सांगितले. सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर क्र. MH-06/BW-5156 किं. रु. ४०,००,०००/— व त्यामधील ८ ब्रास रेती किं. रु. ४०,०००/— तसेच आरोपीचा मोबाईल फोन कीं १०,०००/—रू. असा एकूण रु. ४०, ५०, ०००/— चा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक नामे सचिन अरुण आगासे वय २८ वर्ष रा . रोहना ता. मोहाडी जि. भंडारा तसेच ट्रक मालक रेवानंद भिवा चकोले रा. मोहगाव ता. मोहाडी जि. भंडारा यांचे विरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७),४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१, खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस हर्ष पोद्दार सा., मा. अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी साहेब कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, स.फौ. भास्कर मेटकर, पो. हवा. सतीश नागपुरे, चासफौ कोठे, पो.अं अतुल निंबरते, पो.अं आशीष रडके यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर